# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>(घन कचरा व्यवस्थापन, आर/मध्य विभाग.)</u>**

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात</u>

**विषय** :-आर/मध्य विभागात गणेशोत्सव काळात विसर्जन स्थळांवर व विविध विसर्जन मार्गिकांवर स्वच्छतेच्या सेवा पुरविण्यासाठी अशासकिय संस्था/कंपनीची नियुक्ती करणेबाबत.

आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, गणेशोत्सव काळात विसर्जन स्थळांवर व विविध विसर्जन मार्गिकांवर स्वच्छतेच्या सेवा पुरविण्यासाठी आर/मध्य विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या अशासकिय संस्था/कंपनी यांच्याकडून स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज मागवून पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. १६००/- अधिक १८ टक्के वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात भरल्यानंतर दि.०१.०९.२०२६ ते दि.०८.०९.२०२६, सकाळी १०:०० ते दुपारी ०१:०० यावेळेत विकत मिळु शकेल. पात्र यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थां अथवा कंपनी यांना कामाचे वाटप आर/मध्य विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.०८.०९.२०२६ (दुपारी ०३:०० वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत. सदर जाहीरातीच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकारी सहाय्यक आयुक्त, आर/मध्य यांना असतील व ते अर्ज करणा-या संस्थेस बंधनकारक असतील.

सही/-

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)

आर/मध्य विभाग